MHYA160001592019

खटला दाखल तारीख : २७.०२.२०१९
खटला नोंदणी तारीख : २७.०२.२०१९
निकालाची तारीख : १४.०९.२०२६
कालावधी : ०७ वर्ष ०२ महिने १७ दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालय,बाभुळगाव

(पीठासीन अधिकारी – श्री एच.एस.सातपुते यांचे समोर)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ३९/२०१९.** **निशाणी क्र. ६५/ब**

- महाराष्ट्र सरकार मार्फत
  पोलीस ठाणे बाभुळगाव,
  ता. बाभुळगाव जि. यवतमाळ. ....**अभियोग पक्ष.**

:: **विरुध्द** ::

(१) विवेक मुरलीधर परडखे
वय : ३८ वर्ष, धंदा : शेती,
राहणार : विरखेड, ता. बाभुळगाव
जिल्हा यवतमाळ.

(२) संदिप उर्फ सोनु निळकंठराव येंन्डे
वय : ३० वर्ष, धंदा : शेती,
राहणार : अंतरगाव, ता. बाभुळगाव
जिल्हा यवतमाळ.

(३) संजय देवरावजी राऊत
वय : ३५ वर्ष, धंदा : शेती,
राहणार :घारफळ, ता. बाभुळगाव
जिल्हा यवतमाळ.

....**आरोपी.**

**गुन्हा – भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ आणि १८८ सह कलम ३४ अन्वये.**

.................................................................................................................................

- सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री. पी. डी. राठोड
- आरोपीचे विधीज्ञ – श्री. डी. आर. हजारे

.................................................................................................................................

## न्यायनिर्णय

(आज दिनांक १४ मे, २०२६ रोजी पारीत)

आरोपी क्र. १ ते ५ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ आणि १८८ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :–

२) मौजे विरखेड येथील तलाठी श्री. राजु शंकर डोंगरे यांना दिनांक २९/०५/२०१८ रोजी १४.३० वाजण्याच्या सुमारास मंडळ अधिकारी बाभुळगाव श्री. पी. एस. घोडे यांनी बाभुळगाव तहसील कार्यालयात बोलावून अवैध रेती साठयाचा पंचनामा करण्याकरीता विरखेड येथे जाणे आहे असे सांगीतले. त्यावेळी ते, नायब तहसीलदार बदकी, मेश्राम, मंडळ अधिकारी पी. एस. घोडे व विरखेड येथील पोलीस पाटील असे मिळून सुमारे १३.०० वाजण्याच्या सुमारास सरकारी गट क्र. ४८ मौजा विरखेड या ठिकाणी ते गेले असता त्याठिकाणी आजुबाजुला रेतीचा साठा आढळून आला. सदरच्या साठ्यांच्या मालकीबाबत लोकांकडे विचारणा केली असता सदर रेती साठा हा आरोपींचा असल्याचे व आरोपींनी बेंबळा नदीतुन रेती काढून सदरचा रेती साठा केल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी आरोपी क्र. १ विवेक परडखे रा. विरखेड याच्याकडे ४० ब्रास रेतीसाठा ज्याची किंमत १६,०००/–रुपये, आरोपी क्र. २ संदीप उर्फ सोनु निळकंठराव येंडे रा. अंतरगाव याच्याकडे २५ ब्रास रेतीसाठा ज्याची किंमत १०,०००/–रुपये आरोपी क्र. ३ संजय देवरावजी राऊत रा. घारफळ याच्याकडे ५० ब्रास रेतीसाठा ज्याची किंमत २०,०००/– रुपये असा एकुन ११५ ब्रास रेती साठयाची चोरी करुन अवैध रेतीसाठा केला. त्यानंतर श्री राजु निळकंठराव डोंगरे तलाठी मौजे विरखेड यांनी त्याबाबतची माहीती तहसीलदार

बाभुळगाव यांना दिली. तहसिलदार बाभुळगाव यांनी आदेश दिल्यानंतर राजु निळकंठराव डोंगरे तलाठी मौजे विरखेड यांनी दिनांक १८.०६.२०१८ रोजी लेखी तक्रार दाखल केल्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

३) फिर्यादीने दिलेल्या लेखी रिपोर्टवरुन पोलीस ठाणे बाभुळगाव येथे आरोपी क्र.१ ते ३ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९,१८८, ११४ आणि जमीन महसुल अधिनियम कलम ४८(७)(८) प्रमाणे अपराध क्र. २१९/२०१८ नोंदविण्यात आला आहे. तपासाचे काम सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही. टी. देशमुख यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले आहेत. इतर कागदपत्रे मिळाल्यानंतर आरोपींविरुध्द तपासाअंती पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. २८ वर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ व १८८ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन आरोपींना मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी दोषारोपातील मजकूर कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली आहे.

५) आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने सात साक्षीदार तपासले आहेत. निशाणी क्र. ३३ वर साक्षीदार क्र. १ राजु निळकंठराव डोंगरे (फिर्यादी), निशाणी क्र. ४१ वर साक्षीदार क्र. २ सुधाकर शेषराव चौधरी (साक्षीदार), निशाणी क्र. ४२ वर साक्षीदार क्र. ३ सुनिल रघुनाथ बुल्हे (घटनास्थळ पंच), निशाणी क्र. ४५ वर साक्षीदार क्र. ४ प्रफुल शरदराव घोडे (साक्षीदार), निशाणी क्र. ४७ वर साक्षीदार क्र. ५ दिलीप पांडुरंग बदकी (साक्षीदार), निशाणी क्र. ४९ वर साक्षीदार क्र. ६ राजु रामराव इंगोले (साक्षीदार) व निशाणी क्र. ५१ वर साक्षीदार क्र. ७ विनोद त्र्यंबकराव देशमुख (तपासीक अधिकारी) अन्वये तपासले आहेत. दिनांक १२/०२/२०२६ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे.

६) आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे स्पष्टीकरण अनुक्रमे निशाणी क्र. ६२ ते ६४ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

७) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित झाले आहेत. त्या प्रत्येक मुद्दयांना मी कारणांसह खालीलप्रमाणे उत्तर

दिलेले आहे.

| अ.क्र. | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २९/०५/२०१८ रोजी १४.३० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी संगणमत करुन बेंबळा नदी पात्रातून ११५ ब्रास रेतीची अवैध रित्या चोरी करुन साठवणूक केली. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |
| २) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी जिल्हाधिकारी यांचा आदेश असतांना त्याचे उल्लंघन करुन अवैधरित्या रेतीसाठा करुन ठेवला.त्यामुळे त्यांनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १८८ अन्वये गुन्हा केला आहे? | ..... नाही. |
| ३) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. ३४ वरील पत्र, निशाणी क्र. ३५ वरील जबानी रिपोर्ट, निशाणी क्र.३६ वरील प्रथम खबर अहवाल, आर्टीकल अ ते क वरील रेतीचे पंचनामे, सुप्रुतनामा व जप्तीपत्रक, आर्टीकल– ड वरील पत्र, निशाणी क्र. ४३ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र. ५२ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ५३ वरील बाभुळगाव पोलीस स्टेशनला दिलले पत्र, निशाणी ५४ वरील रेतीचा लिलाव करण्याकरीता दिलेले पत्र आणि निशाणी ५५ ते ५७ आरोपींना दिलेल्या नोटीसा इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ व २ करीता**

८) आरोपी क्र. १ ते ३ यांनी दिनांक २९/०५/२०१८ रोजी १४.३० वाजण्याच्या सुमारास बेंबळा नदी पात्रातून अंदाजे ११५ ब्रास रेती शासनाच्या अनुमतीशिवाय चोरी करुन त्याची साठवणूक केली व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन अवैधरित्या रेतीचा साठा करुन ठेवला हे सिध्द करण्याकरीता १ ते ७ साक्षीदारांना तपासले आहेत.

९) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ याने न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगीतले आहे की, आरोपी क्र. १ ते ३ हे विरखेड येथील असल्याने तो त्यांना ओळखतो. सन २०१८ मध्ये तो विरखेड येथे तलाठी म्हणून कार्यरत होता. दिनांक २९.०५.२०१८ रोजी त्याला मंडळ अधिकारी यांनी दुपारी २.३० वाजता तहसिल कार्यालय बाभुळगाव येथे बोलविले. त्यांनी त्याला रेतीचा पंचनामा करण्यासाठी विरखेड येथे जायचे आहे असे सांगीतले. त्यानंतर मंडळ अधिकारी घोडे, नायब तहसीलदार मेश्राम, नायब तहसीलदार बदकी व मंडळ अधिकारी इंगोले यांच्यासह ते विरखेड येथे गट क्र. ४८ या ई–क्लास जमिनीत गेले. तेथे त्यांना तिन रेतीचे साठे आढळले. त्यापैकी पहीला रेतीसाठा ४० ब्रास हा विवेक परडाखे याचा असल्याचे समजले. दुसरा रेतीसाठा २५ ब्रास हा सोनु येंडे याचा असल्याचे समजले. तसेच तिसरा रेतीसाठा ५० ब्रास हा संजय गावंडे याचा असल्याचे समजले. सदर माहीती त्यांना गावातील पोलीस पाटील यांच्याकडून समजली. त्यानंतर दोन साक्षीदारांसमक्ष त्यांनी आर्टीकल– अ ते क रेतीचा पंचनामा , सुप्रूतनामा व जप्तीपत्रक तयार केलेत. त्यावर त्यांच्या व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगत आहेत. त्यानंतर त्यांनी सदरचे पंचनामे व अहवाल तहसील कार्यालयात दाखल केले. तहसीलदार यांनी निशाणी क्र. ३४ च्या पत्राने आरोपीविरुध्द तक्रार देण्याचे सांगीतले होते. निशाणी क्र. ३५ प्रमाणे त्यांनी आरोपींविरुध्द रिपोर्ट दिला व निशाणी क्र. ३६ वरील प्रथम खबरी अहवाल त्यांनी दिला असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगुन त्यावर त्याची सही असल्याचे सांगीतले.

१०) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ हा साक्षीदार असून न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, आरोपी विवेक परडखे आणि फिर्यादी राजु डोंगरे यांना तो ओळखतो. सन २०१८ मध्ये तालाठी डोंगरे यांनी विरखेड येथील वर्ग इ जमीन गट क्र. ४८ मध्ये बोलविले होते. तेथे रेती साठयाजवळ फिर्यादी होते. फिर्यादी डोंगरे यांनी त्यांच्यासमोर रेतीसाठयाचा पंचनामा केला व रेतीसाठा जप्त केला. त्यानंतर त्यांनी पंचनाम्यावर सही केली. फिर्यादीने त्याला रेतीसाठा

विवेक परडखे याचा असल्याचे सांगीतले. त्यानंतर फिर्यादीने सुप्रूतनामा करुन सदर रेतीसाठा त्याच्या ताब्यात दिला. त्यानंतर त्यांनी तहसीलदार यांना सदर रेती पावसाळयात वाहुन जावु शकते असा आर्टीकल–अ व ब वरील अहवाल दिला. त्यावर त्याची सही असल्याचे सांगत आहे. आर्टीकल–क वरील जप्ती पंचनामा व सुप्रुतनाम्यावर त्याच्या सहया आहेत. दिनांक ०२.०७.२०१८ रोजी आर्टीकल–ड वरील पत्र साक्षीदाराचे तोंडी पुराव्याने सिध्द केले आहे.

११) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ हा घटनास्थळ पंच असून तो न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, तो आरोपी विवेक परडखे व फिर्यादी राजु डोंगरे यांना ओळखतो. सन २०१८ मध्ये त्याला पोलीसांनी पंचनामा करण्याकरीता बोलविले नव्हते. त्याला पोलीसांनी केवळ पंचनाम्यावर सही करण्यात सांगीतले. त्याला घटनास्थळ पंचनामा दाखविल्यानंतर त्याने निशाणी ४३ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरील सही त्याची असल्याचे सांगीतले परंतू त्यातील मजकुराविषयी त्याला माहीती नसल्याचे त्याने सांगीतले. सदरचा साक्षीदार हा अभियोग पक्षाला सहाय्य करीत नसल्यामुळे त्याचा उलटतपास घेण्यात आला परंतू त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही.

१२) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ हा साक्षीदार असून तो न्यायालयाच्या समोर शपथेवर असे सांगत आहे की, तो फिर्यादी राजु डोंगरे, दिलीप बदकी, मनोहर मेश्राम यांना ओळखतो. मनोहर मेश्राम हे मरण पावले आहेत. तो आरोपी विवेक परडखे, संदीप येंडे व संजय राऊत यांना ओळख्तो. दिनांक २९.०५.२०१८ रोजी ते बाभुळगाव तहसील कार्यालया अंतर्गत बाभुळगाव येथे मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी नायब तहसीलदार बदकी व मेश्राम यांनी त्याला व तलाठी राजु डोंगरे यांना विरखेड येथे वर्ग–इ जमीन गट क्र. ४८ मध्ये बोलविले होते. तेथे त्यांना तिन ठिकाणी रेतीसाठे आढळले. त्यापैकी एक ४० ब्रास, दुसरा २५ ब्रास व तिसरा ५० रेतीसाठा होता. तलाठी डोंगरे यांनी आर्टीकल – अ ते क रेतीसाठयाचे पंचनामे व जप्तीपंचनामे दाखविण्यात आलेत. ते तेच असल्याचे सांगीतले आहे. त्यानंतर तलाठी डोंगरे यांनी तहसीलदार कार्यालयात त्याबाबत अहवाल सादर केला. त्यानंतर तहसीलदार यांचे आदेशानुसार तलाठी डोंगरे यांनी बाभुळगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

१३) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ५ हा साक्षीदार असून तो न्यायालयाच्या समोर शपथेवर असे सांगत आहे की, सन २०१८ मध्ये ते बाभुळगाव येथे नायब तहसीलदार या पदावर

कार्यरत होते. दिनांक २९.०५.२०१८ रोजी तहसीलदार यांचे आदेशाप्रामणे ते, मंडळ अधिकारी घोडे, तलाठी डोंगरे, निवासी नायब तहसीलदार मेश्राम असे मिळून विरखेड येथे सरकारी जमीन गट क्र. ४८ मध्ये गेले होते. तेथे त्यांनी पोलीस पाटील चौधरी याला बोलविले. तेथे त्यांना तिन रेतीसाठे आढळले. त्यानंतर तलाठी व मंडळ अधिकारी यांनी रेतीचा पंचनामा केला. त्यानंतर ते तलाठी व मंडळ अधिकारी यांना पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देवून तेथून निघून गेले. तेथे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या समक्ष चौकशी केली असता रेतीसाठे आरोपी विवेक परडखे, संदीप येंडे व संजय राऊत यांनी केल्याचे समजले. सदर रेती साठा हा अंदाजे ११५ ब्रास होता. सदर रेती पोलीस पाटील यांच्या ताब्यात सुप्रुतनामा करुन दिली. त्यानंतर तहसीलदार यांच्या आदेशाने तलाठी यांनी फिर्याद दिली.

१४) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ६ हा साक्षीदार असून तो न्यायालयाच्या समोर शपथेवर असे सांगत आहे की, दिनांक २९.०५.२०१८ रोजी ते बाभुळगाव येथील वेणी सर्कलमध्ये मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होते. सदरच्या दिवशी ते नायब तहसीलदार बदकी, नायब तहसीलदार मेश्राम, तलाठी डोंगरे यांच्यासोबत मौजा वाटखेड रोडवर गट क्र. ४८ मध्ये अवैध रेतीसाठे जप्त करण्याकरीता गेले होते. त्याठिकाणी त्यांनी साधारणतः १.०० वाजता गेल्यानंतर रोडच्या बाजुला त्यांना दोन ठिकाणी रेतीचा साठा केलेला आढळून आला. त्यानंतर तलाठी डोंगरे यांनी पंचनामा केला. त्याठिकाणी एकुन ११५ ब्रास रेतीचे साठे आढळून आले. सदरचे रेतीसाठे विवेक मुरलीधर परडखे, सोनु निळकंठ येंडे व संजय राऊत यांनी केल्याचे निदर्शनास आले. सदरची रेती त्यांनी पोलीस पाटील सुधाकर चौधरी यांच्याकडे सुप्रुतनाम्यावर दिली. त्यानंतर तलाठी डोंगरे यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला व आरोपींविरुध्द प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला.

१५) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ७ हे तपासीक अधिकारी असून तो न्यायालयाच्या समोर शपथेवर असे सांगत आहे की, सन २०१८ मध्ये ते पोलीस स्टेशन येथे ए. पी. आय म्हणून कार्यरत होते. दिनांक १८.०६.२०१८ रोजी अपराध क्र. २१९/२०१८ कलम ३७९ सह कलम ३४, ११४ व १४४ भारतीय दंड संहिता या गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. त्यावेळी त्यांना केस डायरी, एफ. आय. आर., जबानी रिपोर्ट, इत्यादी कागदपत्रे प्राप्त झालीत. त्यानंतर दिनांक १९.०६.२०१८ रोजी ते मौजा विरखेड ते वाटखेड जाणाऱ्या रोडवर गेले व त्यांनी निशाणी क्र. ५२ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यावर त्यांची व दोन पंचांच्या सहया आहेत.

त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे ते सांगत आहेत. त्यानंतर तलाठयांनी केलेले पंचनामे मिळण्याकरीता त्यांनी बाभुळगाव तहसीलदार यांना निशाणी क्र. ५३ वरील पत्र दिले. त्यानंतर त्यांना काही दिवसांनी त्यांना आर्टीकल अ ते क वरील तलाठयांनी केलेले पंचनामे प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी रेतीचा लीलाव करण्याकरीता निशाणी ५४ ने तहसीलदार यांना पत्र दिले. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर खरा असल्याचे सांगत आहे. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. त्यानंतर त्यांनी निशाणी क्र. ५५ ते ५७ वरील आरोपींना नोटीसा देवून सोडण्यात आले. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगत आहे. त्यानंतर त्याने आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

१६) अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्य सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. राठोड व आरोपीतर्फे श्री. डी. आर. हजारे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ याच्या तोंडी पुराव्याने आरोपींविरुध्द तक्रार देण्याकरीता तहसीलदार यांनी दिलेले निशाणी क्र. ३४ वरील पत्र, निशाणी क्र. ३५ वरील फिर्याद, निशाणी क्र. ३६ वरील प्रथम खबरी अहवाला यातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. निशाणी क्र. ३५ वरील जबानी रिपोर्टचे अवलोकन केले असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी मौजा विरखेड येथील सरकारी जमीन गट क्र. ४८ मध्ये एकुन ११५ ब्रास रेतीची चोरी करुन अवैधरित्या साठा करुन ठेवलेला होता. त्यामुळे साक्षीदार क्र. १ याने सन २०१८ मध्ये मौजा विरखेड येथे कार्यरत असतांना दिनांक २९.०५.२०१८ रोजी मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार यांच्या समक्ष आर्टीकल–अ ते क वरील पंचनामे करुन सदरची रेती जप्त केली होती. आर्टीकल– अ ते क वरील पंचनामे केल्यानंतर सदरची रेती ही साक्षीदार क्र. २ याच्या ताब्यात आर्टीकल–ड वरील सुप्रूतनाम्याच्या आधारे देण्यात आली होती. साक्षीदार क्र. १, २, ४, ५ व ६ यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता मौजा विरखेड येथील सरकारी जमीन गट क्र. ४८ मध्ये ११५ ब्रास रेतीचे साठे कोणी केले होते, सदरची रेती ही कोणत्या वाहनाने आणली होती व कधी आणली होती हे त्यांना माहीती नसल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र. १ हा त्याच्या उलटतपासात गट क्र. ४८ ही शासनाची जमीन असून सदरची रेती कोणी आणली व

कधीपासून त्या जागेवर होती हे त्याला माहीती नसल्याचे सांगत आहे. साक्षीदार क्र. १ हा सरकारी जागेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ही त्याची असल्याचे मान्य करीत आहे. साक्षीदार क्र. १ हा कोणत्या सरकारी विभागाच्या परवानगीने सदर जमीनीवर रेती आणुन ठेवली होती की नाही हे त्याला माहीती नसल्याचे सांगत आहे. सदरचे साक्षीदार हे जप्त केलेल्या रेतीचे पुन्हा काय झाले हे देखील त्यांना माहीती नसल्याचे सांगत आहेत. साक्षीदार हे जमीन गट क्र. ४८ या जागेशी आरोपींचा काहीही संबंध नसल्याचे सांगत आहेत. साक्षीदार क्र. २ हा मौजा विरखेड येथील पोलीस पाटील असुन तो देखील त्याच्या उलटतपासात साक्षीदार क्र. १ याने सदरचा रेती साठा हा आरोपींनी केल्याचे सांगीतल्यामुळे त्याला माहीती झाले. त्याबाबत त्याने स्वतः चौकशी केली नव्हती. आरोपींचा रेती साठ्याशी काही संबंध नाही याबाबी मान्य करीत आहे. साक्षीदार क्र. ५ हा सन २०१८ मध्ये नायब तहसीलदार म्हणून बाभुळगाव येथे कार्यरत होता. सदरचा साक्षीदार हा घटनास्थळावर जाण्या व्यतिरिक्त त्याचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे त्याचा व आरोपींचा कोणताही संबंध आलेला नाही याबाबी मान्य करीत आहे. साक्षीदार क्र. ६ हा सन २०१८ मध्ये मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होता. सदरचा साक्षीदार देखील त्याच्या उलटतपासात तो गट क्र. ४८ मध्ये गेल्याबाबत त्याच्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. त्याने स्वतः स्थानीक चौकशी केली नव्हती याबाबी मान्य करीत आहे. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहे. अभियोग पक्षाने त्याची निशाणी क्र. ४३ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरील सही सिध्द केली आहे. सदरचा साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे घटनास्थळ सिध्द झाले नाही. साक्षीदार क्र. ७ हा तपासीक अधिकारी असून त्याच्या तोंडी पुराव्याने निशाणी क्र. ५२ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ५३ वरी पंचनामे मिळण्याकरीता दिलेले पत्र, निशाणी क्र. ५४ वरील रेतीचा लिलाव करण्याकरीत दिलेले पत्र ई. कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षाने सिध्द केलेला आहे. साक्षीदार क्र. ७ याच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्याने देखील ज्याठिकाणी रेती ठेवली होती त्या जागेशी आरोपींचा काही संबंध नाही ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द निशाणी क्र. २८ वर ठेवलेला भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९, १८८ सह कलम ३४ अन्वये ठेवलेला दोषारोप सिध्द होत नाही. माझ्या पूर्व अधिकाऱ्यांनी जमीन महसुल अधिनियम ४८(७) व (८) अन्वये दोषारोप ठेवलेला नाही. त्यामुळे सदरच्या गुन्हयातून आरोपीला दोषमुक्त करणे योग्य राहील. म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता**

१७) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरुन मी या निष्कार्षास आलेलो आहे की, भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९, १८८ सह कलम ३४ लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक संशयाचे पलीकडे जाऊन आरोपीविरुध्द सिध्द झालेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**–: आदेश :–**

(१) आरोपी क्र. १ विवेक मुरलीधर परडखे, आरोपी क्र. २. संदिप उर्फ सोनु निळकंठराव येंन्डे व आरोपी क्र. ३ संजय देवरावजी राऊत यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९, १८८ सह कलम ३४ या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

(३) आरोपी क्र. १ ते ३ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्यांची उपस्थितीची हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेचे जमानत द्यावी. आरोपींनी दिलेले वैयक्तीक जमानत आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.05.14 17:39:52 +0530

बाभुळगाव.
दिनांक : १४/०५/२०२६.

(एच.एस.सातपुते)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
बाभुळगाव.